महाराष्ट्र शासन

# जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी कार्यालय, सांगली

( आपत्ती व्यवस्थापन शाखा )

**पत्ता-** विजयनगर, सांगली, **फोन नं.**-0233-2600500 **Email-** sanglirdc@gmail.com

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**वाचले** 1. भारतीय साथ रोग नियंत्रण अधिनियम 1897

2. आपत्ती व्यवस्थापन अधिनियम 2005
3. फौजदारी प्रक्रिया संहिता 1973 चे कलम 144
4. महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभाग यांचेकडील क्रमांक करोना 2020/प्र.क्र. 58/आरोग्य-5, दि.13/03/2020, 14/03/20 20 तसेच 15/03/2020 रोजीच्या अधिसुचना.
5. महाराष्ट्र शासन यांचेकडील अधिसुचना No.DMU/2020/CR.92/DisM-1, दिनांक 23 व 24 मार्च 2020.
6. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील No. DMU/2020/CR.92/DisM-1, दिनांक 08/01/2022 रोजीचे आदेश
7. या कार्यालयाकडील आदेश क्र.गृह-1/कार्या-6/कोरोना-498/2022 दि.09.01.2022
8. या कार्यालयाकडील दुरुस्ती आदेश क्र.गृह-1/कार्या-6/कोरोना-499/2022 दि.10.01.2022
9. शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील शासन परिपत्रक क्रमांक संकीर्ण:2021/प्र.क्र. 178/एसडी-6 दि.20.01.2022

---

क्र.गृह.1/कार्या-6/कोरोना/आरआर- 03 /2022 दिनांक:- 22/01/2022

## आदेश

ज्याअर्थी, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील पत्र दिनांक 14 मार्च 2020 अन्वये कोरोना विषाणू (कोव्हिड 19) चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथ रोग प्रतिबंधात्मक कायदा, 1897 मधील तरतूदींच्या अंमलबजावणीसाठी अधिसुचना निर्गमीत करणेत आलेली आहे आणि त्याबाबतची नियमावली प्रसिध्द केली असून जिल्हाधिकारी हे त्यांचे कार्यक्षेत्रात कोव्हिड 19 वर नियंत्रण आणण्यासाठी व त्याचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी ज्या उपाय योजना करणे आवश्यक आहे, त्या करण्यासाठी सक्षम प्राधिकारी म्हणून घोषित करणेत आलेले आहे. त्याच प्रमाणे आपत्ती व्यवस्थापन अधिनियम 2005 मधील तरतुदी प्रमाणे जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण हे कोणतीही आपत्ती रोखण्यासाठी किंवा आपत्तीविरुध्द प्रतिबंधात्मक उपाय योजना करण्यासाठी सक्षम प्राधिकारी आहेत.

आणि ज्याअर्थी, मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील No. DMU/2020/CR.92/DisM-1, दिनांक 29/06/2020 रोजीच्या आदेशामध्ये जिल्ह्यातील परिस्थिती प्रमाणे संबंधीत जिल्ह्याच्या जिल्हाधिकारी यांना जिल्ह्यातील रुग्ण स्थितीनुसार आदेश काढणेबाबत सर्वाधिकार देणेत आलेले आहेत

ज्याअर्थी, राज्य शासनाकडील वाचले क्र.6 अन्वये पारित करणेत आलेल्या आदेशानुसार सांगली जिल्ह्यात या कार्यालयाकडील वाचले क्र. 7 व 8 अन्वये प्रतिबंधात्मक आदेश पारित करणेत आला आहे. तसेच राज्य शासनाकडील वाचले क्र. 9 चे शासन परिपत्रकान्वये स्थानिक परिस्थिती विचार करून जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणास इ. 1 ली ते 12 वी पर्यंतच्या शाळा सुरु ठेवणे अगर बंद ठेवणेचे अधिकार प्रदान करणेत आले आहे. तथापि, सांगली जिल्ह्यातील दि.21.01.2022 रोजी संपणाऱ्या आठवडयाचा कोव्हीड-19 च्या RT-PCR व RAT तपासणीचा पॉझिटीव्हीटी दर हा 23.99 % इतका आहे. तसेच सांगली जिल्ह्यातील कोरोना बाधित रुग्णांच्या संख्येत व कोव्हीड तपासणीच्या पॉझिटीव्हीटी दरामध्ये सातत्याने व वेगाने वाढ होत आहे, तरी सदर परिस्थितीचे अवलोकन करता सांगली जिल्ह्यातील वाढत असलेल्या कोरोना रुग्णसंख्येवर नियंत्रण मिळविणेसाठी पुढील काही कालावधीकरीता सांगली जिल्हा स्थलसीमा हद्दीतील इ. 1 ली ते 12 वी च्या सर्व शाळा बंद ठेवणे आवश्यक आहे.

त्याअर्थी, मी डॉ.अभिजीत चौधरी, जिल्हादंडाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, सांगली मला वाचले क्र.1 ते 4 व 9 अन्वये प्राप्त झाले अधिकारानुसार सांगली जिल्ह्यातील दि.21.01.2022 रोजी संपणाऱ्या आठवडयाचा कोव्हीड-19 च्या RT-PCR व RAT तपासणीचा पॉझिटीव्हीटी दर हा 23.99 % इतका जास्त असलेने, तसेच सांगली जिल्ह्यातील कोरोना बाधित रुग्णांच्या संख्येत व कोव्हीड तपासणीच्या पॉझिटीव्हीटी दरात सातत्याने व वेगाने वाढ होत असलेने, खालील बाबी वगळता सांगली जिल्हा स्थलसीमा हद्दीतील इ. 1 ली ते 12 वी च्या सर्व शाळा दि.31.01.2022 रोजी पर्यंत बंद ठेवणेचे आदेश देत आहे.

....2....

1. विविध शैक्षणिक बोर्डाकडून दहावी आणि बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी राबवायचे उपक्रम
2. प्रशासकीय कामकाज आणि शिक्षकांनी अध्यापनाव्यतिरिक्त करावयाचे कामकाज.
3. शालेय शिक्षण विभाग, कौशल्य आणि उद्योजकता विकास विभाग, तांत्रिक आणि उच्च शिक्षण विभाग, वैद्यकीय शिक्षण विभाग, महिला व बाल विकास विभाग किंवा इतर तत्सम प्राधिकरणांकडून राबविण्यात येणारे किंवा परवानगी दिलेले उपक्रम.

सदर बंद ठेवणेत आलेल्या इ. 1 ली ते 12 वी च्या शाळा ऑनलाईन पद्धतीने सुरु ठेवणेबाबत शिक्षण विभाग, जिल्हा परिषद, सांगली व शिक्षण विभाग, सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका यांनी सर्व शाळांना त्यांचे स्तरावरून कार्यप्रणालीबाबत स्वतंत्र सूचना / निर्देश निर्गमित करावेत.

सदरचा आदेश माझे सही शिक्क्यानिशी दिला असे आज दि. 22.01.2022

DISTRICT MAGISTRATE जिल्हा दंडाधिकारी सांगली SANGLI.

( डॉ.अभिजीत चौधरी )
**जिल्हादंडाधिकारी तथा अध्यक्ष,**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, सांगली**

**प्रत-**

1. व्यवस्थापक, शासकीय मुद्रणालय, येरवडा कारागृह, पुणे यांचेकडे महाराष्ट्र राजपत्रामध्ये प्रसिध्दीसाठी व त्याच्या प्रती पुरविणेसाठी रवाना.
2. मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. सांगली यांना पुढील कार्यवाहीसाठी
3. पोलिस अधिक्षक, सांगली यांना पुढील कार्यवाहीसाठी
4. आयुक्त, सां.मि.कु.महानगरपालिका, सांगली यांना पुढील कार्यवाहीसाठी
5. उपविभागीय दंडाधिकारी सर्व यांना पुढील कार्यवाहीसाठी
6. जिल्हा माहिती अधिकारी, सांगली यांना पुढील कार्यवाहीसाठी
7. तहसिलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी सर्व यांना पुढील कार्यवाहीसाठी
8. सर्व मुख्याधिकारी नगरपरिषद / नगरपंचायत यांना पुढील कार्यवाहीसाठी